# दापोली अर्बन
## को-ऑप.बँक लि.,दापोली

मुख्य कार्यालय : वीर सावरकर मार्ग,
पोस्टलेन, दापोली, जि. रत्नागिरी. ४१५ ७१२
फोन नं. : ०२३५८ - २८३९४७, २८४९८८
Email : dubmain@rediffmail.com / dubmain@yahoo.com



कापडी पिशवी घरोघरी,
पर्यावरणाचे रक्षण करी.

## ५९ वा
## वार्षिक अहवाल व ताळेबंद
## सन २०१७-२०१८





# दापोली अर्बन
## को-ऑप. बँक लि.,दापोली

## • संचालक मंडळ •

अध्यक्ष



श्री.जयवंत शं.जालगांवकर

उपाध्यक्ष



श्री.माधव रा.शेट्ये



डॉ.प्रशांत कि.मेहता



ॲड.डॉ.वसंत मो.मेहेंदळे



श्री.सुभाष का.मालू



श्री.अशोक बा.वाडकर



श्री.चंद्रकांत ग.कळसकर



श्री.प्रभाकर पां.शिंदे



श्री.अन्वर अ.गफूर रखांगे



श्री.शैलेश श.मोरे



श्री.संदिप र.दिवेकर



श्री.विनोद र.आवळे



श्री.प्रमोद गो.काटकर



सौ.रमा सु.बेलोसे



सौ.संगिता सं.तलाठी



श्री.संदिप र.खोचरे
तज्ञ संचालक



श्री.राजेंद्र म.गोरे
तज्ञ संचालक



श्री.आत्माराम का.चोगले
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.प्रसाद कृ.परांजपे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.संभाजीराव म.थोरात
मुख्य कार्यकारी अधिकारी

# ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त भागधारक सभासदांसाठी)

बँकेच्या भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची **एकोणसाठावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १२ ऑगस्ट २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता, 'सेवाव्रती शिंदे गुरुजी सभागृह, नवभारत छात्रालय, दापोली'** येथे होणार आहे. तरी बँकेच्या भागधारक सभासदांनी सभेस उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**-: सभेपुढील कामे :-**

१) दिनांक १३ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या ५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेला सन २०१७-२०१८ अखेरचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक (अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चासह ) वैधानिक लेखा परिक्षक यांचे सर्टिफिकेटसह वाचून मंजूर करणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेली दि.३१ मार्च २०१८ अखेरची नफा वाटणी मंजूर करणे व लाभांश जाहीर करणे.

४) दि. ३१ मार्च २०१८ अखेरचे वैधानिक लेखापरिक्षक यांचे अहवालाची नोंद घेणे.

५) सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

६) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम ३५ प्रमाणे बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.

७) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.

८) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता कंकरंट व अंतर्गत लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

९) थकीत वाहनतारण कर्जासाठी तारण असलेल्या वाहनांचा लिलाव करून, लिलावामधून कर्ज रकमेची पूर्णत: वसुली न झालेल्या, तसेच दिनांक ३१ मार्च २०१० अखेर मुदत संपून अनुत्पादक जिंदगी डी-३ वर्गवारी मध्ये गेलेल्या थकीत कर्जांचे वसुलीचे हक्क कायम ठेवून त्या कर्जखात्यांचे निर्लेखन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

१०) बँकेच्या शाखांसाठी आवश्यक असलेल्या जागा मालकी हक्काने खरेदी करणेबाबत विचार विनिमय करणे.

११) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.

१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभासदांकडून आलेल्या लेखी सुचनांचा व आयत्यावेळी येणाऱ्या सूचनांचा विचार करणे.

**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने,**

**दापोली**
दि. २९ जून २०१८

**(संभाजीराव म.थोरात)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सभेबाबत सूचना**

१) गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास ती सभा पोटनियम क्र. ३५ (३) प्रमाणे अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा सभेला गणसंख्येची अट राहणार नाही.

२) सभासदांनी आपल्या लेखी सूचना दि.०६/०८/२०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात पोहचतील अशा पाठवाव्या.

३) बँकेचा ५९ वा अहवाल, ताळेबंद/नफा तोटा पत्रक व पोटनियम दुरुस्ती प्रकरण बँकेच्या मुख्य कार्यालयासह सर्व शाखांमध्ये नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेले असून वार्षिक अहवालाच्या प्रतीही उपलब्ध करुन ठेवलेल्या आहेत.

४) बँकेचा वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्रक तसेच अन्य हिशेबी कामकाजाबाबत भागधारक सभासदांना आवश्यक असलेली माहिती बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये उपलब्ध करुन ठेवलेली असून, बँकेच्या कोणाही भागधारक सभासदांस कार्यालयीन वेळेत ती पाहता येईल व त्याबाबत काही शंका असल्यास त्याचे त्वरीत निराकरण केले जाईल. सभासदांच्या वैयक्तिक शंकांबाबत त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळून भागधारक सभासदांना सभागृहामध्ये चर्चा करणेसाठी पूर्ण वेळ मिळावा यासाठी अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# परिशिष्ट 'अ'

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | : | दापोली अर्बन को-ऑप.बँक लि., दापोली |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | : | वीर सावरकर मार्ग, पोस्टलेन, पो.ता.दापोली, जि.रत्नागिरी पो.बॉक्स नं. १९, पिन ४१५ ७१२ |
| नोंदणीची तारीख व क्रमांक | : | क्र. २५८७२, दि. २९/०२/१९६० |
| रिझर्व्ह बँकेकडून बँकेस परवाना मिळाल्याची तारीख व क्रमांक | : | क्र. यु.बी.डी.एम.एच. ७९३ पी., दि. २२/१२/१९८६ |
| कार्यक्षेत्र | : | महाराष्ट्र राज्य |
| मुख्य कार्यालयासह शाखांची संख्या | : | १२ |
| सभासद | : | नियमित - ३८२९५ |
| | : | नाममात्र - ५७३ |

## बँकेची आर्थिक स्थिती : दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर

(रक्कम लाखात)

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | : | | ९७२.४३ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | : | | १६७३.८५ |
| **ठेवी** | : | | २९८६५.७९ |
| मुदत ठेव | : | २२६३६.६७ | |
| बचत ठेव | : | ६८४७.५३ | |
| चालू ठेव | : | ३७२.६५ | |
| इतर ठेवी | : | ८.९४ | |
| **कर्जे** | : | | १८८३९.६७ |
| सुरक्षित (सिक्युअर्ड) | : | १७९९७.१८ | |
| असुरक्षित (अनसिक्युअर्ड) | : | ८४२.४९ | |
| अग्रक्रम क्षेत्र (एकूण कर्जाशी प्रमाण) | : | | ४१.३५ % |
| दुर्बल घटक (अग्रक्रम क्षेत्राशी प्रमाण) | : | | २५.६२ % |
| गुंतवणूक | : | | ११५४८.६९ |
| थकबाकी | : | | १.९६ % |
| नफा | : | | १०१.२५ |
| खेळते भांडवल | : | | ३२८०५.६९ |
| कर्मचारी संख्या | : | | १०९ |
| ऑडीट वर्ग | : | | ''अ'' |

# ५९ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद : सन २०१७-२०१८

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनी यांसी**

सादर प्रणाम !

बँकेच्या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेल्या सर्व सन्माननिय बंधु-भगिनींचे संचालक मंडळाचे वतीने मी हार्दिक स्वागत करतो.

गेल्या आर्थिक वर्षात बाजारात असलेली मंदी, शासकीय रोख्यांचे दरांमध्ये मोठ्या प्रमाणात होणारा चढ उतार, त्यामुळे करावी लागणारी तरतूद, कर्ज मागणीचे कमी होणारे प्रमाण आणि बँकींग क्षेत्रात सुरु असलेली स्पर्धा या सर्व गोष्टींशी यशस्वीपणे सामना करीत, रिझर्व्ह बँकेचे नियम व वेळोवेळी येणारे आदेश याचे पालन करुन बँकेचे कामकाज चांगल्या प्रकारे करण्याचा या संचालक मंडळाने प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे.

आपला ग्राहक ओळखा (K.Y.C.), ठेवीवरील व्याजातून परस्पर होणारी कर कपात (T.D.S.), विशिष्ठ रकमेवरील कोणत्याही प्रकारचे कर्ज देताना पॅनकार्डची गरज या व अशा अनेक नियमांमुळे बँकेच्या ठेव व कर्ज वाढीवर परिणाम झालेला असून त्याचा बँकेच्या प्रगतीवर नकळत परिणाम होत आहे. सभासदांना जरी या सर्व नियमांचा त्रास होत असला तरी तुम्हीच बँकेचे मालक असल्यामुळे आपली बँक मोठी होणेसाठी आपण सर्वांनी त्यासाठी बँकेस सहकार्य करुन आपले सर्व बँकींग व्यवहार आपल्या याच बँकेतून करणे आवश्यक आहे. तरच आपल्या बँकेची प्रगती होणार आहे.

आपल्या बँकेला शृंगारतळी, ता. गुहागर व खेर्डी, ता. चिपळूण या दोन ठिकाणी शाखा सुरु करणेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने परवाना दिला असून, नजीकचे काळात या दोन शाखांचे कामकाज सुरु होईल.

बदलत्या बँकींग व्यवस्थेची संचालक मंडळाने नोंद घेवून, त्याप्रमाणे आपल्या कामकाजामध्ये बदल केले असून त्याची बँकेच्या ग्राहकांना सर्वकष माहिती होईपर्यंत ते बदल जाचक वाटु नयेत म्हणून ग्राहक मेळावे घेवून या बदलत्या अर्थव्यवस्थेबाबत सभासद व ग्राहक यांना मार्गदर्शन करण्याचा संचालक मंडळाने निर्णय घेतलेला आहे.

या सर्व अवस्थेतून मार्ग काढीत बँकेला प्रगती पथावर नेण्याचे काम संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग करीत असून दिनांक १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील बँकेच्या प्रगतीचा अहवाल आपल्या समोर ठेवताना मला आनंद होत आहे.

**सभासद व वसूल भागभांडवल :-**

अहवाल सालामध्ये बँकेच्या सभासद संख्येमध्ये व वसूल भागभांडवलामध्ये झालेल्या वाढीचा तपशील खालीलप्रमाणे.

| तपशील | सभासद संख्या | शेअर्सची रक्कम |
|---|---|---|
| दि. ३१ मार्च २०१७ अखेर | ३८,००३ | ९,१५,४४,६७०/- |
| अहवाल सालात झालेली वाढ | ६२३ | ७२,७५,५९०/- |
| अहवाल सालात झालेली घट | ३३१ | १५,७६,९५०/- |
| दि. ३१ मार्च २०१८ अखेर | ३८,२९५ | ९,७२,४३,३१०/- |

दि. ३१ मार्च २०१८ अखेर बँकेचे एकूण सभासद ३८२९५ असून, त्यापैकी १५९४९ सभासदांनी बँकेच्या प्रचलित पोटनियम क्र. ११(१) (ब) मधील तरतूदीनुसार रु. १,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे शेअर्स धारण केले असून, त्यापेक्षा कमी रकमेचे शेअर्स धारण केलेल्या सभासदांची संख्या २२३४६ आहे. तसेच या आर्थिक वर्षात झालेल्या नाममात्र सभासदांची संख्या ५७३ आहे.

**निधी :-**

बँकेचे स्थैर्य हे तिच्या स्वनिधींवर अवलंबून असते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात बँकेस सरकारी रोख्यांमधील खरेदी केलेल्या सिक्युरीटीजपैकी काही सिक्युरीटीजचे बाजारातील अनियमित चढ उतारामुळे वर्गीकरण बदलणे (Shifting) गरजेचे झाले. त्यामुळे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या काही सिक्युरीटीज बँकेने हेल्ड टू मॅच्युरीटी या कॅटेगीरी मध्ये वर्ग केल्या. मात्र असे शिफ्टींग करताना शिफ्टींग करावयाच्या सिक्युरीटीजची रक्कम बाजारभावाप्रमाणे असणे किंवा तेवढी करुन घेणे आवश्यक असते. परंतु शिफ्टींग करणे आवश्यक झालेल्या सिक्युरीटीजचे मुल्य बाजारभावापेक्षा कमी असल्यामुळे बँकेकडे उपलब्ध असलेल्या गुंतवणूक चढ उतार निधीमधील रक्कम नांवे टाकून शिफ्टींग करावयाच्या विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सिक्युरीटीजचे मुल्य बाजारभावाप्रमाणे करुन घेण्यात आले. तसेच बँकेकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या काही सिक्युरीटीज बाजारातील चढ उतारांमुळे त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदींचा विचार करुन त्यातील विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सिक्युरीटीज (AFS) कमी करण्यात आल्या. बँकेकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सिक्युरीटीजसाठी (AFS) रु. २५.०० लाख इतकी तरतूद आवश्यक आहे. मात्र बँकेने त्यापोटी रु.२७.६३ लाख इतकी तरतूद करुन ठेवली आहे. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेच्या एकूण निधीची रक्कम रु. १६,७३,८४,८९९.९४ इतकी आहे.

**ठेवी :-**

बँकेमधील ठेवींमध्ये वाढ होण्याचे दृष्टीने संचालक मंडळ नेहमीच प्रयत्नशील असते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात झालेल्या नोटबंदीमुळे बँकेच्या ठेवींमध्ये ३६ कोटींची वाढ झाली. त्या कालावधीत खात्यांमधील पैसे काढण्याच्या मर्यादेवरही निर्बंध होते. मात्र रिझर्व्ह बँकेने रक्कम काढण्याची मर्यादा काढून टाकल्यानंतर खातेदारांनी आपल्या खात्यामध्ये भरणा केलेली रक्कम त्यांच्या गरजेनुसार वेळोवेळी काढून घेतली. तसेच बँकेने जास्त व्याजदरांच्या ठेवी खातेदारांना परत केल्या. त्यामुळे बँकेच्या ठेवींमध्ये या आर्थिक वर्षात घट झाली. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. ३०८,२६,२८,८०४.४० इतक्या होत्या. अहवाल सालात त्यामध्ये रु. ९,६०,४९,३९४.९१ इतकी घट होवून दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. २९८,६५,७९,४०९.४९ एवढ्या झाल्या आहेत.

**ठेवींचा रक्कमनिहाय तपशील**

| ठेव रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | एकूण ठेवींशी प्रमाण |
|---|---|---|---|
| ५,०००/- पर्यंत | ७१,५५४ | ६,३४,२७,४३३.०८ | २.१२ % |
| ५,००१/- ते २५,०००/- | १७,८५९ | २४,५८,२८,४१९.५९ | ८.२३ % |
| २५,००१/- ते ५०,०००/- | १४,८८५ | ५८,८१,२२,७९८.१८ | १९.६९ % |
| ५०,००१/- ते १,००,०००/- | १०,८५० | ७८,७१,०७,२५२.९५ | २६.३६ % |
| १,००,००१/- ते ५,००,०००/- | ४,३३२ | ७३,०१,६१,५६८.१७ | २४.४५ % |
| ५,००,००१/- ते १०,००,०००/- | २१५ | १५,१२,७७,४२२.२७ | ५.०७ % |
| १०,००,००१/- ते २०,००,०००/- | ६७ | ९,६८,८९,५०२.७२ | ३.२४ % |
| २०,००,०००/- पेक्षा जास्त | ५१ | ३२,३७,६५,०१२.५३ | १०.८४ % |
| **एकूण** | **१,१९,८१३** | **२९८,६५,७९,४०९.४९** | **१००.०० %** |

बँकेने रु. ५०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या ठेवी असलेल्या सर्व ठेवीदारांचा रु. १,००,०००/- रकमेचा अपघात विमा उतरविलेला असून, त्याच्या विम्याच्या हप्त्याची रक्कम रु. ८,०५,६६१/- मात्र बँकेने नफ्यातून भरलेली आहे.

## ठेव सुरक्षितता :-

आपली बँक डिपॉझीट इन्शुरन्स क्रेडीट अँड गॅरेंटी कॉर्पोरेशनची सभासद असून, बँकेने या वर्षाचे ठेव विमा संरक्षण हप्त्याची रक्कम रु. ३५,८०,३५८/- मात्र डिपॉझीट इन्शुरन्स कॉर्पोरेशनकडे भरणा करुन सभासद व ठेवीदारांचे ठेवींच्या सुरक्षिततेची काळजी घेतली आहे.

**पाच वर्षातील ठेवींचा तपशील :-**

| सन | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी रु. | २५४,१५,४१,७०९/- | २६९,०४,१५,४३२/- | २७२,००,१८,९१३/- | ३०८,२६,२८,८०४/- | २९८,६५,७९,४०९/- |

## गुंतवणूक :-

बँकेच्या स्थैर्याचे दृष्टीने गुंतवणूक हा महत्वाचा घटक आहे. दि. ३१ मार्च २०१७ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु.१२४,०५,८९,८६४/- इतकी होती. अहवाल सालात बँकेचे कर्जपुरवठ्यामध्ये वाढ झाल्यामुळे गुंतवणूक रु. ८,५७,२१,१५५/- ने कमी झाली असून, दि.३१ मार्च २०१८ अखेर बँकेची गुंतवणूक रु. ११५,४८,६८,७०९/- एवढी झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे बँकेने एकूण गुंतवणूकीपैकी सरकारी रोख्यांत रु. ७२,४४,०९,८६०/- ची गुंतवणूक केलेली असून, त्याचे एकूण गुंतवणूकीशी प्रमाण ६२.७२% एवढे आहे. सदरचा संपूर्ण व्यवहार आय.डी.बी.आय.बँकेकडील S.G.L. (सबसिडीअरी जनरल लेजर) खात्यामधून करण्यात आलेला आहे. बँकेने या गुंतवणूकीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद केलेली असून, केलेली गुंतवणूक पूर्णपणे सुरक्षित ठेवण्याची दक्षता घेतलेली आहे.

## कर्जे :-

दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी बँकेच्या येणे कर्जाची रक्कम रु. १७९,३४,९३,९९८.६० एवढी होती. अहवाल सालात त्यात रु. ९,०४,७२,७९९.१७ इतकी वाढ झाली असून, दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर एकूण येणे कर्ज रु.१८८,३९,६६,७९७.७७ इतके आहे. या आर्थिक वर्षातील कर्जवाढीचे प्रमाण ५.०४% इतके आहे.

**येणे कर्जाचा रक्कमनिहाय तपशील**

| कर्ज रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | एकूण कर्जाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| ३०,०००/- पर्यंत | १३,४५२ | १८,७९,२९,२५६.२० | ९.९८ % |
| ३०,००१/- ते १,००,०००/- | ७,९१४ | ४१,६५,७४,४७८.२० | २२.११ % |
| १,००,००१/- ते ५,००,०००/- | २,७८२ | ५२,६९,३२,०३०.२१ | २७.९७ % |
| ५,००,००१/- ते २५,००,०००/- | ४७० | ४४,४१,९७,६१९.४४ | २३.५८ % |
| २५,००,००१/- ते ५०,००,०००/- | ४५ | १५,३३,९५,१८८.४४ | ८.१४ % |
| ५०,००,०००/- पेक्षा जास्त | १८ | १५,४९,३८,२२५.२८ | ८.२२ % |
| **एकूण** | **२४,६८१** | **१८८,३९,६६,७९७.७७** | **१००.०० %** |

रिझर्व्ह बँकेचे धोरणानुसार, बँकेने अग्रक्रम क्षेत्र व दुर्बल घटकांना त्यांचे मागणीनुसार कर्जपुरवठा केलेला असून त्याची माहिती पुढीलप्रमाणे-

| तपशील | कर्जदार संख्या | कर्ज रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|
| अग्रक्रम क्षेत्र | ६,५०५ | ७७८९.९१ |
| दुर्बल घटक | २,१५६ | १९९५.८१ |

अग्रक्रम क्षेत्रासाठी एकूण कर्ज वाटपाच्या ४१.३५% कर्ज वाटप केलेले असून, दुर्बल घटकांना केलेल्या कर्ज पुरवठ्याचे अग्रक्रम क्षेत्राशी प्रमाण २५.६२% आहे.

बँकेकडून रु. २० लाख मर्यादेपर्यंत कर्ज घेतलेल्या कर्जदारांचा प्रतिवर्षी अपघात विमा उतरविण्यात येतो. या योजनेअंतर्गत अपघाती निधन झालेल्या कर्जदारांचे कुटूंबियांवर कर्जाचा बोजा न पडता विमा कंपनीकडून त्याची परतफेड केली जाते व त्यामुळे कर्जदाराचे कुटूंबियांवर कोणताही आर्थिक बोजा पडत नाही. अशा प्रकारे कर्जदारांची बँकेने काळजी घेतलेली आहे.

## थकबाकी :-

बँकेने थकबाकी वसूलीसाठी प्रामाणिक प्रयत्न करुनही दि. ३१ मार्च २०१८ अखेर रु. ३,६९,४७,८२७.७५ इतकी कर्ज थकबाकी राहिलेली असून, त्याचे एकूण येणे कर्जाशी प्रमाण १.९६% इतके आहे. थकीत झालेल्या कर्जाचे वसुलीसाठी तारण दिलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करुन थकबाकी वसूलीची कारवाई करण्यात येते. भविष्यात थकीत कर्जदारांवरील न्यायालयीन कारवाई टाळण्यासाठी कर्जदार व जामीनदारांनी आपली कर्जफेडीची जबाबदारी विचारात घेवून कर्जाची नियमित परतफेड करुन बँकेस सहकार्य करावे.

## कालनिहाय कर्ज थकबाकी :-

(रक्कम लाखात)

| कालावधी | ६ महिन्यांचे आतील | ६ महिने ते १ वर्ष | १ ते २ वर्ष | २ ते ५ वर्ष | ५ वर्षावरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जखाती संख्या | ५५६ | ६२ | ६७ | ९८ | २२३ | १००६ |
| रक्कम | ६६.५७ | २३.०६ | ४१.२५ | १२३.४१ | ११५.१९ | ३६९.४८ |

## कर्जप्रकारनिहाय थकबाकी :-

(रक्कम लाखात)

| अ. क्र. | कर्ज प्रकार | येणे कर्ज | | थकीत | | थकबाकीचे प्रमाण (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खाती संख्या | रक्कम | खाती संख्या | रक्कम | कर्ज प्रकाराशी | एकूण येणे कर्जाशी |
| १ | व्यापारासाठी मुदतीची कर्जे | २६ | ५७८.४५ | ४ | ०.५६ | ०.१०% | ०.०१% |
| २ | जामीन तारण कर्ज | ९१७ | ५३१.९२ | ३४० | ५९.३४ | ११.१६% | ०.३१% |
| ३ | वाहन तारण कर्ज | १६२० | २०२४.१० | ३९४ | १५४.७१ | ७.६४% | ०.८२% |
| ४ | मशिनरी तारण कर्ज | ६३ | १८५.११ | २२ | ३३.९३ | १८.३३% | ०.१८% |
| ५ | वस्तु तारण कर्ज | ५९ | ४०.७७ | १७ | ३.५२ | ८.६३% | ०.०१% |
| ६ | स्थावर तारण कर्ज | ४८६ | २२८९.०३ | ११३ | ३५.०९ | १.५३% | ०.१९% |
| ७ | ठेवतारण कर्ज | ४३१ | ४४४.७६ | -- | -- | -- | -- |
| ८ | सरकारी रोखे तारण कर्ज (एन.एस्.सी.) | १ | ०.२६ | -- | -- | -- | -- |
| ९ | नजर गहाण कॅश क्रेडीट कर्ज | ४८५ | २७३०.५३ | ४३ | ३९.२० | १.४४% | ०.२१% |
| १० | सोने तारण कर्ज | १९८२३ | ६७२३.०२ | -- | -- | -- | --- |
| ११ | ओव्हरड्राफ्ट (ठेवीचे तारणावरील) | १३० | १९१.०२ | -- | -- | -- | -- |
| १२ | शैक्षणिक कर्ज | ३१ | ७३.३२ | ४ | ०.१६ | ०.२२% | -- |
| १३ | कार लोन | २१ | १५९.२३ | -- | -- | -- | -- |
| १४ | स्थावर तारण कर्ज (व्यापारी कारणांसाठी) | १३० | १५५६.१३ | ३५ | ३३.३४ | २.१४% | ०.१८% |
| १५ | लोकनेते बेलोसे पर्यटन कर्ज | ४ | १४.६७ | -- | -- | -- | -- |
| १६ | प्रॉपर्टी मॉर्गेज कर्ज | ४८ | ४१९.७८ | ९ | ४.३८ | १.०४% | ०.०२% |
| १७ | शामराव पेजे ग्रामीण घरकूल कर्ज | १० | ४.१९ | -- | -- | -- | -- |
| १८ | इन्फ्रास्ट्रक्चर कर्ज | १३ | १२८.२७ | ७ | ३.३० | २.५७% | ०.०२% |
| १९ | बँक कर्मचारी कर्ज | २०४ | ४२७.५१ | -- | -- | -- | -- |
| २० | पगारदार जामीन कर्ज | १६१ | २६६.८५ | १८ | १.९५ | ०.७३% | ०.०१% |
| २१ | वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियेसाठी कर्ज | १ | ०.३२ | -- | -- | -- | -- |
| २२ | शासकीय व निमशासकीय पगारदार कर्ज | १३ | ४३.४० | -- | -- | -- | -- |
| २३ | ओव्हरड्राफ्ट (सोनेतारणावरील) | ४ | ७.०३ | -- | -- | -- | -- |
| | एकूण | २४६८१ | १८८३९.६७ | १००६ | ३६९.४८ | --- | १.९६% |

दि. ३१ मार्च २०१८ अखेर थकीत कर्जदारांवर कर्जवसुलीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व ९१ अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे :-

(रक्कम लाखात)

| तपशील | दाव्यांचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|
| | कलम १०१ अन्वये | | कलम ९१ अन्वये | |
| | दावे संख्या | रक्कम | दावे संख्या | रक्कम |
| दि.३१ मार्च २०१७ अखेर शिल्लक | १०७ | ९८.८६ | - | - |
| अहवाल सालात दाखल | - | - | ५ | १०.२९ |
| अहवाल सालात वसूल | ३० | २३.३२ | - | - |
| दि.३१ मार्च २०१८ अखेर शिल्लक | ७७ | ७५.५४ | ५ | १०.२९ |

## शाखानिहाय ठेवी, कर्जे, थकबाकी व एन.पी.ए. :-

दि.३१ मार्च २०१८ अखेर बँकेच्या शाखानिहाय ठेवी, कर्जे, थकबाकी, एन.पी.ए. व एन.पी.ए. तरतूदीची माहिती खालीलप्रमाणे -

(रक्कम लाखात)

| अ. क्र. | शाखेचे नांव | ठेवी | कर्जे | कर्ज थकबाकी | | एन.पी.ए. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | प्रमाण(%) | रक्कम | तरतूद |
| १ | मुख्य कार्यालय | ८.९४ | --- | --- | --- | --- | --- |
| २ | दापोली | १७२७८.६८ | ८०९४.७६ | १५०.१६ | १.८६ | २९८.३४ | ११५.३५ |
| ३ | हर्णै | १८८०.०२ | ११४९.९० | ३.०३ | ०.२६ | ३.८८ | २.७७ |
| ४ | मंडणगड | १३६१.४० | १३५४.९६ | १०.९८ | ०.८१ | ३९.४० | ४.९५ |
| ५ | केळशी | १२४५.२० | ४७८.१३ | ५.३१ | १.११ | १३.२० | ५.२० |
| ६ | खेड | २२११.६० | १८८८.५९ | २१.५१ | १.१४ | ५१.२८ | ११.११ |
| ७ | रत्नागिरी | २६३२.१३ | २५६८.०३ | १४०.३७ | ५.४७ | २१८.१७ | ९६.४७ |
| ८ | भरणे | ६६०.०२ | ८३२.४७ | १६.३४ | १.९६ | ४०.१३ | १७.५८ |
| ९ | दाभोळ | ९५४.८२ | १००८.२३ | १५.७३ | १.५६ | २७.५६ | ११.१७ |
| १० | बुरोंडी | ६५५.३१ | ३०६.६८ | ०.०० | --- | ०.०० | --- |
| ११ | गोरेगांव | ४७२.५१ | ७००.९६ | २.२२ | ०.३२ | २.६९ | ०.७७ |
| १२ | गुहागर | ५०५.१६ | ४५६.९६ | ३.८३ | ०.८४ | १६.२१ | ३.४० |
| | एकूण | २९८६५.७९ | १८८३९.६७ | ३६९.४८ | १.९६ | ७१०.८६ | २६८.७७ |

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेने नक्त उत्पन्न देणाऱ्या जिंदगीसाठी तसेच बुडीत व संशयित कर्ज निधीसाठी नियमानुसार रक्कम रु.२६८.७७ लाख इतकी तरतूद करणे आवश्यक आहे. परंतु बँकेने केलेली प्रत्यक्ष तरतूद रु.५२२.२३ लाख एवढी आहे. बँकेने सुरक्षिततेसाठी आवश्यक तरतूदीपेक्षा रु. २५३.४६ लाख इतकी जादा तरतूद केलेली आहे. अशी तरतूद करताना ठेवीदारांचे हिताचा व बँकेच्या सुरक्षिततेचा विचार केलेला आहे.

**शाखानिहाय उत्पन्न, खर्च व नफा :-**

दि. ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षामधील बँकेच्या उत्पन्न व खर्चाचा शाखानिहाय तपशील खालीलप्रमाणे -

(रक्कम लाखात)

| अ.क्र. | शाखेचे नांव | उत्पन्न | खर्च | तरतूद | नफा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय | १०३५.३१ | १३७१.७७ | ८१.०० | - ४१७.४६ |
| २ | दापोली | १८६६.०१ | १५४६.४१ | - | ३१९.६० |
| ३ | हर्णै | २१६.२१ | १८८.८४ | - | २७.३७ |
| ४ | मंडणगड | १८०.९७ | १५९.८८ | - | २१.०९ |
| ५ | केळशी | १२७.२८ | ११३.९३ | - | १३.३५ |
| ६ | खेड | २७४.१२ | २२६.०६ | - | ४८.०६ |
| ७ | रत्नागिरी | ३६१.६७ | ३०८.४७ | - | ५३.२० |
| ८ | भरणे | १०३.२२ | ९२.८१ | - | १०.४१ |
| ९ | दाभोळ | १२३.३१ | १०२.२५ | - | २१.०६ |
| १० | बुरोंडी | ७१.७० | ६९.४० | - | २.३० |
| ११ | गोरेगांव | ८४.८० | ७६.५६ | - | ८.२४ |
| १२ | गुहागर | ६४.५९ | ७०.५६ | - | - ५.९७ |
| | एकूण | ४५०९.१९ | ४३२६.९४ | ८१.०० | १०१.२५ |
| | वजा शाखांतर्गत दिलेले /घेतलेले व्याज | १०५३.१६ | १०५३.१६ | -- | -- |
| | **एकूण** | **३४५६.०३** | **३२७३.७८** | **८१.००** | **१०१.२५** |

दि. ३१ मार्च २०१८ अखेर बँकेचा निव्वळ नफा रु. १,०१,२४,७९८.६५ एवढा आहे.

**नफा विभागणी :-**

महाराष्ट्र राज्य सह. कायदा कलम ६५ अन्वये आवश्यक तरतूदी केल्यानंतर दि. ३१ मार्च २०१८ अखेर बँकेला रु. १,०१,२४,७९८.६५ इतका निव्वळ नफा झाला असून, त्यामध्ये गतसालचा शिल्लक नफा रु. १२८०.८२ मिळविल्यानंतर वाटणी योग्य एकूण नफा रु. १,०१,२६,०७९.४७ एवढा होतो. संचालक मंडळाने नफा विभागणीची पुढील प्रमाणे शिफारस केली असून, आपण त्याला मंजूरी द्यावी अशी विनंती आहे.

### -: नफा विभागणी :-

| अ.क्र. | तपशिल | रक्कम | नफ्याशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १ | रिझर्व्ह फंड | २५,३२,०००.०० | २५.०० % |
| २ | डिव्हीडंड | ७२,००,०००.०० | ७१.११ % |
| ३ | बिल्डिंग फंड | १,००,०००.०० | ०.९९ % |
| ४ | धर्मादाय फंड | १,०२,०००.०० | १.०० % |
| ५ | इन्व्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन रिझर्व्ह | १,१०,०००.०० | १.०९ % |
| ६ | संचालक मंडळ मानधन | ८१,६००.०० | ०.८ १% |
| ७ | शिल्लक नफा | ४७९.४७ | -- |
| | एकूण | १,०१,२६,०७९.४७ | १००.००% |

**लाभांश (डिव्हीडंड) :-**

सन २०१७-१८ करीता सभासदांना ९ टक्के प्रमाणात लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. मात्र त्यासाठी रु. ८४,९३,०००/- इतक्या रकमेची आवश्यकता असून, त्यापैकी रु. ७२,००,०००/- इतकी रक्कम सन २०१७-१८च्या निव्वळ नफ्याचे विभागणीतून घेवून उर्वरीत रक्कम रु. १२,९३,०००/- ही डिव्हीडंड इक्वीलायझेशन फंडातून घ्यावी लागणार आहे. तरी त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची अनुमती मिळावी ही विनंती.

**संचालक मंडळ :-**

अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण २६ सभा झाल्या असून, संचालकांचे सभेतील उपस्थितीचे प्रमाण ८६.३८% आहे. सभांमधील सर्व निर्णय एकमताने घेण्यात आले आहेत. बँकेच्या सर्वांगिण प्रगतीसाठी संचालक मंडळाने प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले असून बँकेच्या प्रगतीचे आकड्यांवरुन ही बाब आपले निदर्शनास येईल.

**संचालक व त्यांचे नातेवाईकांचे कर्जाबाबतची माहिती :-**

(रक्कम लाखात)

| कर्जदार व्यक्ती | मागील वर्षाअखेर (दि.३१.३.२०१७ अखेर) | | अहवाल सालात दिलेली कर्जे (सन २०१७-२०१८) | | सहकारी वर्षात वसूल रक्कम | सहकारी वर्ष अखेर (दि.३१.३.२०१८ अखेर) | | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कर्जदारांची संख्या | येणे कर्ज रक्कम | कर्जदार संख्या | रक्कम | | कर्जदार संख्या | येणे कर्ज रक्कम | |
| संचालक | ३ | २७.६५ | -- | -- | २७.४३ | १ | ०.२२ | नाही |
| नातेवाईक | ५ | १३.०४ | -- | -- | ३.६१ | ४ | ९.४३ | नाही |

टिप :- संचालकांकडून येणे असलेली कर्जे ही ठेवीचे तारणावरील व ते संचालक म्हणून निवडून येण्यापूर्वी त्यांनी घेतलेल्या व त्याची मुदत न संपलेली मुदतीची कर्जे आहेत व ती सर्व कर्जखाती नियमित आहेत.

**सेवक वर्ग :-**

दि. ३१ मार्च २०१८ अखेर बँकेच्या कायम कर्मचाऱ्यांची संख्या १०९ असून, सर्व कर्मचारी बँकेचे सभासद, ठेवीदार आणि ग्राहकांशी कौटुंबिक व मित्रत्वाचे संबंध जोपासून काम करीत आहेत. बँकेच्या प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांबरोबरच १२ सराफ यांचाही मोलाचा सहभाग आहे.

**लेखा तपासणी :-**

**अंतर्गत व कंकरंट हिशेब तपासणी-**

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाची बँकेची अंतर्गत व कंकरंट हिशेब तपासणी मे. जोशी बोरसे अँड पोळ, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी पूर्ण केली असून, त्याचे लेखापरिक्षण अहवाल वेळोवेळी बँकेस प्राप्त झाले आहेत. त्यातील मुद्दयांची बँकेने वेळोवेळी पुर्तता केलेली असून, त्याचा वैधानिक लेखापरिक्षणाचे वेळी चांगला उपयोग झालेला आहे.

**वैधानिक लेखापरिक्षण :-**

सन २०१७-१८ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. वाघ कुलकर्णी अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी केले असून, त्यांनी बँकेच्या चांगल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले असून, बँकेला ऑडिट वर्ग **''अ''** दिला आहे.

**शाखा विस्तार :-**

खेर्डी, ता. चिपळूण व शृंगारतळी, ता. गुहागर या दोन ठिकाणी बँकेच्या नवीन शाखा सुरु करणेसाठी बँकेने रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केले होते. त्यास रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेली असून त्या शाखांचे परवाने बँकेला प्राप्त झालेले आहेत. सदरच्या शाखा लवकरच सुरु करणेचा संचालक मंडळाचा मानस आहे.

**श्रद्धांजली :-**

- अहवाल सालात मृत पावलेले राजकीय व सामाजिक नेते.
- दहशतवादी हल्ल्यांमध्ये बळी पडलेले निरपराध भारतीय जवान व नागरीक.
- नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत पावलेले नागरीक.
- अहवाल सालात मृत पावलेले बँकेचे भागधारक सभासद, ग्राहक व हितचिंतक.

**या सर्वांच्या स्मृतीस आमचे ''विनम्र अभिवादन''**

**आभार :-**

बँकेचे दैनंदिन कामकाज करीत असताना ज्या व्यक्ती व संस्थांच्या सहकार्याने बँक प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे अशांचे नामनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये -

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (अर्बन बँक विभाग) मुंबई ● मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य ● मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग ● मा. विभागीय लेखा परिक्षक, सहकारी संस्था ● मा.जिल्हाधिकारी ● मा.जिल्हा पोलीस अधिक्षक ● मा. उपविभागीय अधिकारी ● मा. तहसिलदार ● महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई ● मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ● मा. जिल्हा विशेष लेखा

परिक्षक, सह. संस्था • मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था • मा. लेखा परिक्षक, सह. संस्था • महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई • महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स्. असोसिएशन लि., मुंबई • कोकण नागरी सहकारी बँक्स्. असोसिएशन लि.,कल्याण • सर्व शाखांचे कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत/नगरपंचायत/नगरपरिषद कार्यालये • जनरल इन्शुरन्स कंपनीशी संलग्न असलेल्या सर्व विमा कंपन्या • सर्व शाखांचे कार्यक्षेत्रातील पोलिस स्टेशन कार्यालये • सेवायोजन कार्यालय • बँकेचे सर्व कायदा सल्लागार व स्थावर, वाहन मुल्यांकनकार • रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सह. बँक • स्टेट बँक ऑफ इंडिया • युनियन बँक ऑफ इंडिया • आय.सी.आय.सी.आय. बँक • आय.डी.बी.आय.बँक • पंजाब अँड महाराष्ट्र बँक • ठाणे भारत सहकारी बँक • उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक • सुर्योदय स्मॉल फायनान्स बँक • सर्व शाखांचे कार्यक्षेत्रातील अन्य बँका, पतसंस्था तसेच पोस्ट ऑफीस • बँकेचे सर्व सन्माननिय सभासद, खातेदार व हितचिंतक

या सर्वांकडून वेळोवेळी मिळत असलेल्या सहकार्यामुळेच बँक उज्वल भविष्याकडे वाटचाल करीत आहे. त्यांच्या सहकार्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो व बँकेच्या प्रगतीसाठी सहकार्याची अपेक्षा करतो.

जय हिंद - जय सहकार !

आपला स्नेही,

**(जयवंत शंकर जालगांवकर)**

**अध्यक्ष**

# सभासदांस नम्र विनंती

- ज्या सभासदांनी रू. १,०००/- पेक्षा कमी रकमेचे शेअर्स धारण केलेले आहेत त्यांनी कमीत कमी रू. १,०००/- चे शेअर्स खरेदी करून बँकेस सहकार्य करावे व आपले सदस्यत्व अबाधित राहील याची दक्षता घ्यावी.
- आपला पत्ता बदललेला असल्यास बदललेला पत्ता बँकेस कळवावा.
- ज्या सभासदांनी अद्याप मागील लाभांशाची (डिव्हीडंड) रक्कम नेली नसेल, त्यांनी ती कृपया त्वरित बँकेच्या कार्यालयीन वेळेत घेऊन जावी. नियमानुसार लाभांश रक्कम तीन वर्षानंतर रिझर्व्ह फंडात वर्ग केली जाते. कृपया आपले नुकसान टाळण्यासाठी प्रत्येक सभासदांनी बँकेत सेव्हींग खाते उघडावे अथवा लाभांश रक्कम नेण्याची व्यवस्था करावी.
- आपण कर्जदार अथवा जामीनदार असाल तर कर्जाची परतफेडीची तारीख, मासिक हप्ता याची नोंद ठेवा व कर्जदार अथवा जामीनदार या नात्याने कर्जाची परतफेड वेळेत होत आहे किंवा नाही याकडे लक्ष ठेवा.
- आपल्या बँकेत विविध आकर्षक ठेव योजनांमध्ये आपण तसेच, आपले कुटूंबिय व मित्र परिवाराला गुंतवणूक करण्यास सांगून सर्वाधिक मिळणाऱ्या व्याजाचा व सुरक्षिततेचा फायदा घ्या.
- बँकेच्या मयत सभासदांचे/खातेदारांचे नातेवाईकांनी, सभासदाचे/खातेदाराचे मृत्युबाबत बँकेला लेखी कळवून वारस प्रकरण सादर करुन सहकार्य करावे.
- आपल्या खात्याला वारस नेमला नसल्यास वेळीच वारस नेमून घ्यावा.
- आपल्या खात्यावरील चेक परत जाणार नाहीत याची काळजी घ्या. कारण चेक परत जाणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे.
- रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार बँकेत खाते उघडताना फोटो व बँकेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असल्याचा पुरावा देणे आवश्यक आहे. तसेच जुन्या खातेदारांनीही के.वाय.सी. कायद्याची पूर्तता करणे बंधनकारक आहे.
- बँकेमध्ये कमीत कमी रू. ५००/- भरून नवीन बचत ठेव खाते सुरू करता येते. खातेदारांनी आपल्या बचत ठेव खात्यावर किमान रु. ५००/- मात्र शिल्लक ठेवून सहकार्य करावे.
- बँकेकडून मिळणाऱ्या सर्व सेवा सुविधांचा लाभ घेऊन सहकार्य करावे.

FORM No. N-1.

[See section 81 and rule 69 (3)]

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,

**The Chairman/Secretary/Chief Executive Officer**
**The Dapoli Urban Co-operative Bank Ltd.**
Veer Sawarkar Marg, Post Lane,
At & Post Dapoli, Dist Ratnagiri 415712

**Ref. :-** Appointment Letter No. DUB/59/651/2017-18Dated 14/08/2017

**Report on the Financial Statements as a Statutory Auditor**

1. We have audited the accompanying financial statements of the Dapoli Urban Co-operative Bank Ltd., which comprise the Balance Sheet as at 31st March 2018 and the Statement of Profit and Loss for the year ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information incorporated in these financial statements of the Bank along with its Branches and Extension counters audited by us for the period 1st April 2017 to 31st March 2018.

**Management's Responsibility for the Financial Statements**

2. Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with Maharashtra Co-operative societies Act, 1960, Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.) and RBI Guidelines. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the applicable Standards by The Institute of Chartered Accountants of India and under the MCS Act / BR Act / RBI guidelines. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement, whether due to fraud or error.

4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Opinion**

